# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 February 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

हवामान बदलाला सामोरं जाण्यासाठी आवश्यक गुंतवणुकीकरता आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि आर्थिक तरतुदीची गरज असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज देशातल्या पहिल्या हवामान परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. ही परिषद चर्चेपेक्षा कृती, गुंतवणूकयोग्य प्रकल्प आणि भागीदाऱ्यांचा मंच ठरावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'हवामान न्याय' हा जागतिक चर्चेचा केंद्रबिंदू असून विकसनशील देशांना विकास आणि पर्यावरण यामध्ये निवड करावी लागू नये, योग्य सहकार्याने आपण हे साध्य करू शकतो, असं मुख्यमंत्री म्हणाले. ग्लोबल साउथमधील शहरे उपायांची वाट पाहत नाहीत, हे जगाला दाखवूया असं आवाहनही त्यांनी केलं. केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यावेळी उपस्थित होत्या.

****

भारत–फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ या कार्यक्रमाचं आज मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मॅक्राँ यांचं तीन दिवसांच्या भारत भेटीसाठी काल मुंबईत आगमन झालं. दोन्ही नेत्यांची आज मुंबईत लोकभवन इथं भेट होणार आहे. उभय देशातल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा ते यावेळी घेतील. दोन्ही देशांतील आघाडीचे व्यावसायिक, उद्योगपती, संशोधक आणि नवोन्मेषक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

****

इंडिया ए आय इंपॅक्ट समिट अर्थात भारत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषदेच्या दुस–या दिवसाचे कार्यक्रम आज नवी दिल्लीत सुरू आहेत. यामध्ये, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून, सर्वसमावेशक आणि कायापालट घडवू शकेल असा

विकास साधण्यावर केंद्रित असलेली उच्चस्तरीय चर्चासत्रं सुरू आहेत. या पाच दिवसीय परिषदेला काल सुरूवात झाली. या परिषदेत, राष्ट्रीय संरक्षणात एआयचा वापर, एआयच्या युगातली सायबर सुरक्षेची धोरणं, यासह अन्य विषयांवरची चर्चासत्रं, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रातला वापर या विषयावरच्या सारग्रंथांचं प्रकाशन, असे अनेक कार्यक्रम होत आहेत. दक्षिण आशियात होणारी या प्रकारची ही पहिली परिषद असून, जगभरातल्या वीस देशांचे नेते या परिषदेला उपस्थित आहेत.

****

दरम्यान, इंडिया ए आय इंपॅक्ट एक्सपो २०२६ म्हणजे संकल्पना, नवोन्मेष आणि उद्देशांचा एक शक्तिशाली मिलाफ आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारतीयांच्या प्रतिभेत, जगाच्या भल्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची असामान्य क्षमता असून,ती या परिषदेतून जगासमोर येत आहे, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. देशाची कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातली प्रगती केवळ भारताच्या नव्हे तर जगाच्या प्रगतीलाही हातभार लावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

****

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज जयपूर इथं देशभरातल्या शेतकऱ्यांसाठी 'भारत-विस्तार' या एआय आधारित डिजिटल सहकारी प्लॅटफॉर्मचा शुभारंभ केला. या माध्यमातून शेतकऱ्यांना हवामान, बाजारभाव, कीटक-रोग, माती, पीक सल्ला आणि सरकारी योजना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. फोन कॉल, चॅटबॉट्स आणि नंतर ॲप याअंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात हिंदी आणि इंग्रजी भाषेतून शेतकर्यांना सेवा मिळणार असून, टप्प्याटप्प्याने प्रादेशिक भाषांचा यात समावेश करण्यात येईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

वाशीम जिल्ह्यातल्या टो-जुमडाफाटा इथल्या श्री मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या भौतिकशास्त्र विषयाच्या परीक्षेदरम्यान मोठ्या प्रमाणावर सामुदायिक कॉपी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. काल भरारी पथकाने या केंद्राची तपासणी केली. केंद्राच्या बैठ्या पथकानंही सामूहिक कॉपीची

नोंद केली आहे. संबंधित दोषी कर्मचा-यांविरोधात निलंबन आणि गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती शिक्षण विभागानं दिली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं शिवकालीन लढाऊ जहाजांच्या प्रतिकृतींवर आधारित दर्यापती शिवराय मराठा आरमार युद्धनौका प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. क्रांती चौकात आयोजित या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त शिव प्रेमींनी लाभ घेण्याचं आवाहन आयोजकांकडून करण्यात आलं आहे.

****

शिवार सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या, प्राध्यापक रा.रं. बोराडे शेतकरी साहित्य पुरस्काराचं वितरण छत्रपती संभाजीनगर इथं येत्या एकवीस तारखेला होणार आहे. मराठवाडा साहित्य परिषदेत होणा-या या कार्यक्रमात श्रीरंग ढेरंगे यांना ‘चित्रक’ या त्यांच्या काव्यसंग्रहासाठी हा पुरस्कार दिला जाणार असून, विशाल तायडे यांना त्यांच्या ‘ढ’ या बालकादंबरीसाठी संदीप दळवी बालसाहित्य पुरस्कार दिला जाणार आहे.

****